दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/३८

## पत्रकार टिपणी

## महानिर्मितीच्या नाट्यस्पर्धेत उरण - मुंबई मुख्यालयाचे "जोगिया" सर्वोत्कृष्ट

**मुंबई** : महानिर्मितीच्या पाचव्या आंतरविद्युत निर्मिती केंद्र नाट्यस्पर्धेत मुंबई मुख्यालय - उरण वायु विद्युत केंद्राद्वारे सादर झालेल्या कु. वेदांती दाणी लिखित व श्री. चंद्रकांत दाणी दिग्दर्शित "जोगिया" या नाटकाने सांघिक प्रथम पुरस्कार प्राप्त केला. कोराडी औ.वि. केंद्राने सादर केलेल्या "कळा या लागल्या जीवा" या नाटकाला द्वितीय तर नाशिक औ.वि. केंद्राच्या "माकडाच्या हाती शँपेन" या नाटकाला तृतीय पुरस्कार प्राप्त झाला.

यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा, मुंबई येथे दि. २३ ते २७ नोव्हेंबर २००९ या कालावधीत ही दर्जेदार स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली. या स्पर्धेत विजेत्यांसह खापरखेडा, चंद्रपूर, पारस, परळी, कोयना, भुसावळ या वीजनिर्मिती संघांनीही सहभाग घेतला होता.

स्पर्धेच्या समारोप तसेच पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून नामवंत नाट्यदिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम बेर्डे हे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार व कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद चौधरी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनिल मुसळे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविकात श्री. अनिल मुसळे यांनी नाट्यस्पर्धेचा आढावा घेतला. श्री. अरविंद चौधरी यांनी आपल्या मनोगतात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या स्पर्धेतील स्पर्धकांचे अभिनंदन करत अशीच सांघिक भावना दैनंदिन कामात जोपासण्याचे आवाहन केले. परीक्षकांच्या वतीने श्री. रणजीत मसुरेकर यांनी मनोगतात स्पर्धेच्या दर्जाबद्दल समाधान व्यक्त करुन रंगकर्मींना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात श्री. मधुकर शेलार यांनी महानिर्मितीच्या रंगकर्मींचे कौतुक करत त्यांनी आता व्यावसायिक रंगभूमीवर व छोट्या पडद्यावर झेप घ्यावी, असे त्यांनी आवाहन केले.

या नाट्यस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. प्रकाश बुध्दिसागर, सौ. वैभवी पवार, व श्री. रणजीत मसुरेकर यांनी काम पाहिले. विशेष अतिथी श्री. पुरुषोत्तम बेर्डे यांनी मनोगतातून थेट प्रेक्षकांशी संवाद साधत संहिता, दिग्दर्शन इत्यादींबाबत मौलिक विचार मांडले.

स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा झी-गौरव, अल्फा गौरव च्या धर्तीवर रंगतदारपणे व उत्साही जल्लोषात संपन्न झाला. या सोहळ्यादरम्यान महानिर्मितीच्या विविध कलावंतांनी नांदी, गणेशवंदना, विनोदी लघुनाटिका, एकपात्री अभिनय या माध्यमातून उपस्थित रसिकांची मने जिंकून घेतली.

पुरस्कार वितरण सोहळ्याचे सुत्र संचालन सौ. राजश्री भोसले यांनी व आभार प्रदर्शन श्री. संजय अस्वले यांनी केले.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे :-

### महानिर्मिती कंपनी आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धा २००९ - १०

| | | |
|---|---|---|
| **नाट्यनिर्मिती विभाग** | | |
| प्रथम पुरस्कार | - | जोगिया (सांघिक कार्यालय, मुंबई व उरण) |
| द्वितीय पुरस्कार | - | कळा या लागल्या जीवा (कोराडी औ.वि. केंद्र) |
| तृतीय पुरस्कार | - | माकडाच्या हाती शँपेन (नाशिक औ.वि. केंद्र) |
| **दिग्दर्शन विभाग** | | |
| प्रथम पुरस्कार | - | श्री. चंद्रकांत दाणी (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण) |
| द्वितीय पुरस्कार | - | श्री. अनिल जोशी (कळा या लागल्या जीवा - कोराडी औ.वि. केंद्र) |
| तृतीय पुरस्कार | - | श्री. चंद्रकांत जाडकर (माकडाच्या हाती शँपेन - नाशिक औ.वि. केंद्र) |
| **अभिनय (पुरुष) विभाग** | | |
| प्रथम पुरस्कार | - | श्री. राजन चांदणे (खजिन्याची विहीर - पोफळी जल विद्युत केंद्र) |
| द्वितीय पुरस्कार | - | श्री. अनिल जोशी (कळा या लागल्या जीवा - कोराडी औ.वि. केंद्र) |
| तृतीय पुरस्कार | - | श्री. राजेश पवार (नवसाचं बोकड - पारस औ.वि. केंद्र) |
| **अभिनय (महिला) विभाग** | | |
| प्रथम पुरस्कार | - | कु. वेदांती दाणी (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण) |
| द्वितीय पुरस्कार | - | अनिला जोशी (कळा या लागल्या जीवा - कोराडी औ.वि. केंद्र) |
| तृतीय पुरस्कार | - | श्रध्दा वरणकर (नवसाचं बोकड - पारस औ.वि. केंद्र) |

**नेपथ्य विभाग**

प्रथम पुरस्कार - श्री. उदय भोसले (खजिन्याची विहीर - पोफळी जल विद्युत केंद्र)

द्वितीय पुरस्कार - श्री. संदीप हिवरखेडकर (कळा या लागल्या जीवा - कोराडी औ.वि. केंद्र)

तृतीय पुरस्कार - श्री. रमेश पांचाळ आणि श्री. शिवाजी तायडे (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)

**प्रकाशयोजना विभाग**

प्रथम पुरस्कार - श्री. उदय पोटे (खजिन्याची विहीर - पोफळी जल विद्युत केंद्र)

द्वितीय पुरस्कार - श्री. वसंत स्वामी आणि श्री. आर.डी. भोर (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)

तृतीय पुरस्कार - श्री. विजय रावळ (माकडाच्या हाती शँपेन - नाशिक औ.वि. केंद्र)

**संगीत विभाग**

प्रथम पुरस्कार - सौ. अर्चना दाणी (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)

द्वितीय पुरस्कार - श्री. दत्तात्रय यरनाळ (माकडाच्या हाती शँपेन - नाशिक औ.वि. केंद्र)

तृतीय पुरस्कार - श्री. ओमप्रकाश पेंटे (नवसाचं बोकड - पारस औ.वि. केंद्र)

**रंगभूषा व वेषभूषा विभाग**

प्रथम पुरस्कार - श्री. मधुकर मुंडे (पूर्णविराम - परळी औ.वि. केंद्र)

द्वितीय पुरस्कार - श्री. किशोर हणमंते (अधांतर - चंद्रपूर महा.औ.वि. केंद्र)

तृतीय पुरस्कार - ज्योत्सना गिरी (उत्तररात्र - भुसावळ औ.वि. केंद्र)

**विशेष लक्षवेधी भूमिका विभाग**

परीक्षकांचा विशेष पुरस्कार - श्री. उमाकांत कुळकर्णी (अधांतर - चंद्रपूर महा.औ.वि. केंद्र)

**उत्तेजनार्थ उत्कृष्ट कलाकार विभाग**

१) प्रज्ञा सावर्डेकर (आसावरी - जोगिया, सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)
२) कविता चौधरी (स्नेहल - उत्तररात्र, भुसावळ औ.वि. केंद्र)
३) प्रतिभा वाले (पेन्सिल - माकडाच्या हाती शँपेन, नाशिक औ.वि. केंद्र)
४) भाऊसाहेब नारनवळे (शेटजी - पूर्णविराम, परळी औ.वि. केंद्र
५) राजू जाधव (पोस्टमन - खजिन्याची विहीर, पोफळी जल विद्युत केंद्र)
६) विशाखा देशपांडे (आई - अधांतर, चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र)
७) माधुरी गणोजे (आनंदीबाई - अग्निदिव्य, खापरखेडा औ.वि. केंद्र)

**उत्तेजनार्थ नाट्यलेखन विभाग**

१) कु. वेदांती दाणी (जोगिया - सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)
२) श्री. भाऊसाहेब नारनवळे (पूर्णविराम - परळी औ.वि. केंद्र)
३) सौ. शीला बिडगर (अग्निदिव्य - खापरखेडा औ.वि. केंद्र)

**उत्तेजनार्थ बाल कलाकार विभाग**

१) सई गोसावी (स्वरा (लहान) - जोगिया, सांघिक कार्यालय, मुंबई व उरण)
२) शंतनु खुरपे (मुलगा - पूर्णविराम, परळी औ.वि. केंद्र)
३) ओंकार कोष्टी (राघव - अग्निदिव्य, खापरखेडा औ.वि. केंद्र)
४) प्राजक्ता पवार (नवसाचं बोकड - नवसाचं बोकड, पारस औ.वि. केंद्र)

---

दिनांक : ३०/११/२००९.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**